**विशेष दिवाणी दावा नं.१०९/२०२३(नि.२१८ लगत)**

**जादा सरतपास वादीतर्फे ॲड. आर. के. तोडकर यांच्यातर्फे :**

५. मला आता नि.क्रं.१२४ वरील साठेखत दाखविणेत आले. सदर दस्तावर ओळख देणार म्हणुन पान नं.११ वर माझी सही आहे.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. जी. एस. भोसले यांच्यातर्फे -**

६. हे म्हणणे खरे आहे की मी सन १९७४ पासुन रहायला पुणे येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की वादी हे लहानपणापासुन व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की वादी हे मी राहतो त्या भागात रहात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की माझा व्यवसाय काही नाही. हे म्हणणे खरे आहे की वादी हे माझे नातेवाईक नाहीत व आम्ही एका शाळेत शिकलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीची मला वैयक्तीक माहिती नाही. दावा मिळकत ही शिरवळजवळ पळशी गावात आहे. हे मला सांगता येणार नाही की पळशी गावात ती मिळकत कोणत्या बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की पळशी गाव कोणत्या ठिकाणी आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की पळशी गावाची आसपासची गावे मला माहिती नाहीत.

७. दुय्यम निबंधक कार्यालय हे खंडाळा येथील एसटी स्टॅण्डच्या पाठीमागे आहे. हे म्हणणे खरे नाही की आजरोजी मी व वादी सोबत आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की साक्ष देण्याबाबत मला न्यायालयामार्फत समन्स आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर केसबाबत मला वादीने माहिती सांगितली. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२४ वरील दस्तामध्ये काय नमुद केले आहे याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की सरतपास कुठे तयार केला याची मला माहिती नाही. तो वाई येथे तयार केला. तो नोटरी ऑफिसमध्ये तयार केला. मला त्या नोटरीचे नाव सांगता येणार नाही. ते कार्यालय न्यायालयाचे इमारतीत आहे. ते कार्यालय खाली आहे. हे मला सांगता येणार नाही की न्यायालयाचे इमारतीत कोणतेही नोटरीचे कार्यालय नाही.

प्रश्न - सरतपास नोटरीच्या कार्यालयात तयार केला व तो या न्यायालयाच्या इमारतीत आहे असे तुम्ही पहिले सांगितले. त्यानंतर या न्यायालयाच्या इमारतीत नोटरीचे कार्यालय नाही हे सांगता येणार नाही असे कथन केले आहे. त्यापैकी कोणती बाब

खरी आहे ?

उत्तर - हे मला सांगता येणार नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की शपथेवर खोटे बोलणे गुन्हा आहे याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की या न्यायालयाचे इमारतीत नोटरीचे कार्यालय आहे हे मी शपथेवर खोटे सांगत आहे. या इमारतीत नोटरीचे कार्यालय कुठे आहे हे मी दाखवु शकतो. हे म्हणणे खरे आहे की ज्या नोटरीपुढे मी सरतपास दिला त्याचे नाव मला माहिती नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की यापुर्वी मी एक ते दोन कागद नोटरी केलेले आहेत. ते कागद मी घराच्या संदर्भात केले होते. नोटरी केलेले कागद मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की नोटरी कागद करणे म्हणजे त्यावर नोटरीचा शिक्का, तिकीट, नाव व सही असते. हे मला सांगता येणार नाही की नोटरीचा शिक्का, तिकीट, नाव व सही असलेला सरतपासाचा कागद दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.२१८ वर नोटरीचा शिक्का, तिकीट, नाव व सही नाही. माझा नि.क्रं.२१८ शी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२४ वर माझी सही आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष इतरांनी सहया केल्या असा कोणताही प्रकार घडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की केवळ वादीला मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी ओळख घातलेला तथाकथीत कागदाबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मला वैयक्तीक माहिती आहे हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक :१३.०१.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.